Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Smruti Arogya Prasarak Mandal's

# Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College, Khamgaon

Dist -Buldhana, Maharashtra

## One Day Inter Disciplinary National Conference on Humanities, Culture and Society

# Certificate

This is to certify that

Dr./Mr./Ms. अलका अनिल मानकर of श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा

has participated / Presented a Research paper titled नवीन आर्थिक धोरण- भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान.

in the one day National Conference on "Humanities, Culture and Society" organised by Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College, Khamgaon on Saturday, 15th Feb 2020.

Dr. Pramod R. Chavan
Convener

Dr. Nilima Deshmukh
Principal

SONY KHAM 9325118683

# VIDYAWARTA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Special Issue- February- 2020

(Vol- 05



Sahakar Maharshi Late Bhaskaarrao Shingne

Smruti Arogya and Shikshan Prasarak Mandal's

# SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGE ARTS COLLEGE,

KHAMGAON, DIST.BULDHANA (M.S.)

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)



◆ Organizes ◆

One Day Inter Disciplinary National Conference on

# HUMANITIES, CULTURE AND SOCIETY

52) विदर्भातील धार्मिक स्थिती
कु.प्रियंका किसन अढाव ||177

53) १९ व्या शतकातील सामाजिक धार्मिक चळवळी
रिता सुरतसिंग राजपूत ||180

54) महात्मा ज्योतिबा फुलेंच्या सामाजिक कार्यातील मानवतावादी दृष्टीकोन
प्रा.कु. वंदना अर्जुन जिवने, भंडारा ||183

55) नविन आर्थिक धोरण- भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हान
डॉ. अलका अनिल मानकर, बुलढाणा ||186

56) मानवी जीवनामध्ये मराठी संस्कृती आणि लोकसंगीतचे महत्व
प्रा. वंदना म देशमुख, डॉ. शिरीष कडू, अकोला ||190

57) मानव जीवनात संगीताची सर्वांगिण सकारात्मक भूमिका
डॉ. गिताली एस. पांडे, अकोला ||193

58) संत साहित्य मराठी
प्रा. कु. भावना मनोज तायडे, यवतमाळ ||195

59) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्रामासंबधी विचार
प्रा.डॉ. हर्षा पं. येवले, बुलडाणा ||199

60) संत साहित्य : आकलन आणि आस्वाद
प्रा. संध्या जंजाळ, यवतमाळ ||202

61) एकत्र कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीजीवन दर्शन (मराठी कादंबरीच्या आधारे)
प्रा. डॉ. सविता माधवराव पवार, मेहकर ||205

62) संगीत का मानव जीवन में स्थान
मिनाक्षी बसवंत, पुणे ||208

63) स्वामी विवेकानंद के साहित्य में युवाओं के लिए विचार
सै. रमिझ सै. वसिम, वाशिम ||211

64) मानव अधिकार तथा आज की वास्तविकता
डॉ. राधा सवजीयाणी, अकोला ||213



www.vidyawarta.com/03 | https://www.printingarea.blogspot.com

55

# नविन आर्थिक धोरण- भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हान

डॉ. अलका अनिल मानकर
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा जि. बुलढाणा

**********

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताची अर्थव्यवस्था एक मागास अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरं भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे होत आहेत. स्वातंत्रोत्तर काळात भारताने संमिश्र अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला. देशाच्या विकासाकरिता मा. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्या नंतर नियोजन पद्धतीचा अवलंब केला. १९५१ पासून पहिली पंचवार्षिक योजना राबविण्यात आली आज जवळजवळ १२ पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या गेल्या. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल अविकसित अर्थव्यवस्थेकडून विकसनशील अर्थव्यवस्थेकडे वेगाने सुरु आहे. १९९१ पासून भारताने आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला गेल्या २९ वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल मिश्र अर्थव्यवस्थेकडून उदयोन्मुख अर्थव्यवस्थेकडे सुरु आहे. गेल्यादोन दशकात भारताच्या आर्थिक वृद्धीचा दर सरासरीने ५% पेक्षाही जास्त राहिला आहे. भारत विविधतेने नटलेली भूमी आहे. आज भारतीय अर्थव्यवस्था वेगाने पुढे येणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते.


नविन आर्थिक धोरणापासून भारताने विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ यात लक्षणीय झेप घेतली आहे. भारतीय बाजाराला स्वदेशी अत्पाद्कांना विदेशी उत्पादकांशी स्पर्धा करावी लागते. आजची अर्थव्यवस्था गुंवात्ताधिष्ट्त अर्थव्यवस्था, ज्ञानाधिष्ट्त अर्थव्यवस्था, बाजाराधिष्ठित अर्थ्यव्यवस्था म्हणून ओळखली जाते. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे भारतीय बाजारातील स्वदेशी उत्पादकांसमोर स्पर्धेचे आव्हान निर्माण झालेले आहे. स्वदेशी उद्योगातील उत्पादन व्यय घटत असून उत्पादनाचा दर्जा उंचावताना दिसतो. भारताच्या निर्यातीत वाढ झाली नविन आर्थिक धोरणाचे अनेक फायदे भारतीय अर्थव्यवस्थेत दिसत असले तरी भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेला अनेक आव्हानांना समर्थपणे सामोरे जावे लागत आहे.

जागतिक स्पर्धेत भारतासमोरील आव्हान. -

**१. मानवी संसाधन विकासावर भर :-**

**अ. शिक्षण :-**

मानवी संसाधानाचा विकास देशासमोर फार मोठे आव्हान आहे. भूमी व श्रम हे अर्थशास्त्रात दोन मुलभूत घटक मानले जातात. आर्थिक विकासाच्या संदर्भात भांडवल या घटकाला विशेष प्राधान्य देण्यात येवू लागले, त्यामुळे मानवी संसाधनाची उपेक्षा होऊ लागली. मानवी संसाधनात प्रामुख्याने १५ ते ६५ वयोगटातील लोकांचा समावेश होतो. मानवी संसाधन घटक हाच खरा देशभक्त घटक आहे. मानवी संसाधन विकासात सक्रीय कामगारांच्या आरोग्य व शिक्षण विकासाचा समावेश होतो.



वरील तक्त्यावरून मानवी संसाधनाची संकल्पना स्पष्ट होते. यात प्रामुख्याने कामगारांचे शिक्षण

महत्वाचे मानले जाते. शिक्षणामुळे मानवी भांडवलाच्या विकासाला चालना मिळते. कारण शिक्षण आदि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिक्षणामुळे आर्थिक विकास होतो आणि आर्थिक विकासामुळे जास्त शिक्षण घेण्याची प्रेरणा निर्माण होते. शिक्षणाचा परिणाम पोषण, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि निवारा इ. वर घडुन येतो. शैक्षणिक विकास म्हणजे मानवी संसाधनाच्या नियोजनाचीं प्रक्रिया असते शिक्षणातून जे कौशल्य व ज्ञान प्राप्त होते त्यामुळे व्यक्तिगत लाभ आधिक दोन असला तरी सामाजिक लाभही होत असतो. म्हणूनच आज शिक्षणक्षेत्रातील गुंतवणूकीमुळे विज्ञान, तंत्रज्ञान तसेच मूलभूत व उपयोजित संशोधनासारख्या क्षेत्रात भारत हे राष्ट्र उच्च दर्जाचे मानवी संसाधन बाळगून आहे.

मानवी संसाधन विकासाच्या शिक्षण प्रकारात कौशल्याधारीत शिक्षण मिळणे आवश्यक आहे. आमच्या देशात जे बुध्दिवान कामगार आहेत, शास्त्रज्ञ आहेत ते परदेशात जाऊन नोकऱ्या करतात कारण त्या ठिकाणी त्यांना मिळणारा मोबदला अधिक असतो हे वदलण्यासाठी आपल्या देशातच त्यांना बडया पगाराच्या नोकऱ्या मिळाव्यात अशी यंत्रणा राबवीण्यात यावी. तसेच संशोधनाच्या क्षेत्रात प्रामुख्याने ग्रामीण. भागातील विद्यार्थी,

शेतकरी, शेतमजूर, यांना विशेष सबलती व संशोधनासाठी अनुदान देण्यात यावे.

**ब. आरोग्य :-**

मानवी संसाधन विकासातील दुसरी बाजू आरोग्य सेवा World Health Orginastion Report नुसार आरोग्य भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान १९४७ साली २७ वर्ष होते. ते २०१० साली ६७,५ वर्ष असून चीन व ब्राझील पेक्षा १० वर्षाने कमी आहे. उपासमार व कुपोषण रोखण्याच्या उपायामुळे सरासरी आयुर्मान भारताचे वाढले आहे. भारतात सर्वात जास्त टी.बी. चे पेशंटस असून जगातील एकूण टी.बी , पेशंटच्या २३ टक्के आहे. कुष्ठरोगी प्रमाण ७४ टक्के, पोलीओ ४२ टक्के, धनुर्वात २२ टक्के, मलेरिया ५५ टक्के आहे. दुसऱ्या क्रमांकावर काजण्या व गोवरचे पेशंटचा क्रमांक जगात लागतो. कॉलराच्या बाबतीत १४ वा क्रमांक लागतो. कुपोषणाच्या बाबतीत भारत जगात वरच्या क्रमांकावर असून ४३.५ टक्के प्रमाणे आहे. जागतीक एकूण लोकसंख्येच्या १७ टक्के लोकसंख्या भारतात आहे. जगातील ६ लोकांपैकी १ माणूस भारतात राहतो. आरोग्याच्या बाबतीत भारतात बराच विरोधाभास आढळतो. भारतात ७० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात पण खर्च आरोग्याच्या बाबतीत सर्व पैसा जिल्हा आरोग्य केंद्र ब नागरी भागातील दवाखान्यावर खर्च होतो.

WHO Unicef World Bank Report नुसार भारतात दर वर्षाला ३,५८,००० माता मृत्यू पावतात त्यापैकी ६३,००० मातांचा मृत्यू गरोदरपणातील क्लिष्टतेमुळे होतो. भारतात जीवन सुरक्षा योजनेवर करोडो रुपये खर्च कले जातात परंतू फारसा प्रभाव मृत्यूदर रोखण्यास झालेला नाही भारतातील माता मृत्यूदर प्रमाणे अफगाणीस्तान, कांगो व इथोपिया हया मागासलेल्या राज्यापेक्षा अधिक आहे. आरोग्य विषयक सुधारणा करतांना केवळ दवाखान्याची संख्या वाढवून चालणार नाही तर कुशल डॉक्टर त्या ठिकाणी असले पाहिजे. अत्याधुनिक शस्त्रक्रिया अल्पदरात उपलब्ध व्हावी. थोडक्यात मानवी संसाधन विकास देशाच्या आर्थिक विकासाच्या कारणासाठी आवश्यक आहे.

**बिल गेट्स (Bill Gates) यांच्या मते,**

"२१ व्या शतकाची उभारणी लोकांच्या सहभागाने व त्या तंत्रज्ञानाने जलद गतीने होईल हे कोणी अमान्य आणि नाकारु शकत नाही."

**२. युवकांच्या प्रश्नांची सोडवणूक हे एक आव्हान :-**

आज जागतिकिकरणाच्या काळात सर्वात मोठा प्रश्न म्हणजे युवकांमधील वाढती बेकारी प्रामुख्याने महाविद्यालयीन स्तरावर कला, वाणिज्य विभागात जे शिक्षण दिले जाते ते परंपरावादी असल्याने, व्यवसायाभिमुख नसल्याने युबकांसमोर फार मोठे आव्हान आहे. रोजगाराच्या समस्येबाबत दहाव्या योजनेचा सुदा म्हणतो की १९८० च्या दशकात व १९९० च्या दशकाच्या पूर्वार्धात रोजगार वाढीचा सरासरी दर दरसाल २ टक्के होता तो १९९० च्या दशकाच्या उत्तर भागात १.१ टक्के पर्यंत उतरला मागील घटकप्रवृत्ती तशाच चालत राहिल्या तर दहाव्या योजनेच्या शेवटपर्यंत खुली व प्रच्छन्न बेकारी मिळून श्रमबळाच्या सध्याच्या २.८ टक्के च्या ऐवजी ५.० टक्के पर्यंत वाढू शकते. १९९० च्या दशकाच्या मध्यापासून आतापर्यंत ग्रामीण पुरुष वेकरीत वाढ झाली आहे आणि ही स्थिती अधिक चिंताजनक आहे. युवकांना पुरेसा रोजगार नसल्याने कृषीवरील अवलंबित्व वाढले जागतिकिकरणामुळे आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्रे या साऱ्या प्रसारमाध्यमातून प्रसारीत होणाऱ्या जाहीराती, लेखन, चित्रपट यामधून सातत्याने श्रीमंत जीवनाचे आकर्षण निर्माण केले जाते त्यामुळे चांगले जीवन जगण्याची कल्पनाच आज बदलत आहे. चांगले जीवन म्हणजे साबण, कपडे, घर, गाडी तयार अन्न इ. भौतिक उपभोग्य वस्तूंचा उपभोग घेणे ही संभ्रमावस्था आज युवकांमध्ये बळावलेली दिसते. त्याचा परिणाम गुन्हेगारी वाढ, बेरोजगारीतून परावलंबित्व, ग्रामीण युवकांचे स्थलांतरत्व, भ्रष्टाचार इ. समस्या निर्माण होत आहेत. हया सर्व समस्या देशाच्या विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करतात त्यामूळे त्या सोडविणे आवश्यक ठरते.

१. मुलींना शिक्षण सक्तीचे करणे.
२. ग्रामीण युवकांना ग्रामीण पातळीवरच रोजगार उपलब्ध करुन देणे.
३. युवकांकरीता आरोग्यदायक खेळाच्या सोयी उपलब्ध करुन देणे.
४. रोजगार हा मुलभूत हक्क मानून रोजगाराची हमी देणे.
५. भूकबळीचा प्रश्न एक आव्हान

आज एकिकडे फार मोठया प्रमाणात देशाच्या संरक्षणाकरीता अणुबॉबवर खर्च होतांना दिसतो तर दुसरीकडे लाखो लोक उपाशी राहतात. भूक म्हणजे काय भूकेची व्याख्या शोधण्यासाठी युनायटेड नेशन्स व अनेक आंतरराष्ट्रीय संस्था उत्तरे शोधत असून हजर प्रोजेक्ट त्यातील एक उदाहरण होय. भूकेची समस्या केवळ, ओरिसातच नाही तर संपूर्ण भारतात आहे. हंगर कमिशनने केलेल्या अहवाला नुसार जगाच्या दक्षिण भागातील एक पट्टाच्या पट्टाच भूकेचा पट्टा आहे. भूक प्रकल्पात जो अभ्यास केला त्यात असे दिसले की जवळजवळ १० दशलक्ष लोक सदैव उपाशी बा अर्धपोटी

असतात. दरवर्षी १३ ते १८ दशलक्ष माणसे भूक आणि उपासमार यांचे शिकार होतात दरवषी १५ दशलक्ष मुले चांगल्या पोषक आहाराअभावी मरण पावतात त्यामुळे अनेक रोगांना बळी पडावे लागते. भारतात जागतिकिकरणाची प्रक्रिया राबवितांना भारताने भूकेचा प्रश्न जागतिक पातळीवर सोडुन हयावा.

**युर्नोच्या नव्या आर्थिक धोरणातील तरतुदी :-**

१. काही मर्यादेनंतर ग्राहकांच्या उपभोगाचे प्रमाण कमी करुन तीच गुंतवणूक विकासात व्हायला हवी.
२. आंतरराष्ट्रीय मदतीचा उपयोग भांडबल उभारणीपेक्षा विज्ञा आणि उदयोग विकासासाठी करणे आवश्यक आहे.
३. देशाची उत्पादनशिलता व रोजदारी वाढवायला हवी.
४. देशाच्या व्यापाराची शक्ती वाढवायला हवी.
५. उपलब्ध असणाऱ्या आंतरराष्ट्रीय मदतीचा उपयोग विकास करण्यासाठी विकासाच्या न्याय वितरणासाठी आणि समान संधीसाठी करायला हवा.

युनिसेफच्या मते, स्त्रियांची साक्षरता जसजशी वाढत जाते तसतशी स्त्रियांमध्ये राजकिय जाणिव निर्माण होवू लागते आणि त्याबरोबर कुटुंब नियोजनाचा विचार केला जातो. आरोग्य सेवांत जशी सुधारणा होते. तसे प्राथमिक शिक्षण वाढीला लागते. शिक्षणाच्या वाढीबरोबर आर्थिक उत्पन्न आणि शेतीचे उत्पन्न वाढु लागते. अधिक उत्पन्न आणि अधिक धान्य उपलब्ध झाले कि बालमृत्यूचे प्रमाण कमी होते मुले चांगली झाली कि आपोआप समाजाचे जीवनमान उंचावू लागते. अशा पध्दतीने ही विकासाची चक्राकार रचना आहे.

युनिसेफचा शिक्षण व अर्थविचार या गोष्टी जर राबविल्या गेल्या तर निश्चितच भूकबळीचा प्रश्न (आव्हान) जागतिकिकरण सोडवू शकेल.

**४. लघु आणि कुटीर उद्योगांचे जागतिकिकरण होणे हे एक आव्हान :-**

फिस्कल कमिशन (१९४९-५०) च्या मते "कारागीर कुटुंबातील व्यक्तिंच्या साहयाने पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ करण्यात येणारा व्यवसाय म्हणजे कुटीरउद्योग होय." तर १० ते १५ पगारी कामगारांच्या सहाय्याने चालविण्यात येणारा व्यवसाय म्हणजे लघुउद्योग होय. लघुउद्योगात भांडबल कमी, आकार लहान, श्रमिक संख्या कमी असते या उद्योगातून रोजगारनिर्मिती, आर्थिक समता, प्रादेशिक समतोल सामग्रीचा पर्याप्त वापर आणि आर्थिक स्थैर्य इ. फायदे होतात या उद्योगाच्या विकासामूळे देशाचा आर्थिक विकास होतो. परंतू आजच्या स्पर्धात्मक काळात बडया उद्योगांशी हे लघुउद्योग स्पर्धा करु शकत नाहीत. आज या उद्योगासमोर औद्योगिक आजारपण, कौशल्याचा अभाव, स्पर्धात्मक वृत्ती, मार्केटिंगचा प्रश्न इ. अनेक समस्या आहेत. जागतिक पातळीवर हे उद्योग अपयशी ठरले आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवरील लघु-कुटीर आणि अतिलघु उद्योग भारतात आणून भारतीय लोकांसाठी प्रशिक्षणासह उपलब्ध करुन दिल्यास या उद्योगात नविन्य येवू शकते. भारतातील ग्रामीण भागात शेतीवर आधारित असणाऱ्या प्रच्छन्न बेकारीचे प्रमाण प्रचंड असल्याने या उद्योगांमूळे बऱ्याच लोकांना रोजगार मिळेल. जागतिकिकरणाच्या काळात केवळ मोठया उद्योगांचाच विचार न करता लघु व कुटीर उद्योगांच्या विकासाकरीता सरकारने लक्ष दयावे या उद्योगाला एक चळवळ म्हणून विकसित करावे.

**५. भ्रष्टाचार :-**

आधुनिक भारतीय अर्थव्यवस्थेसमोर वाढता भ्रष्टाचार ही एक मोठी समस्या निर्माण झालेली आहे. भ्रष्टाचार सार्वत्रिक आहे. तो मानवी प्रवृत्तीशी जोडलेला आहे तो कर्करोग, एड्स व प्रदुषणासारखा आहे. आज भारतातील भ्रष्टाचार वाढु लागला आहे. जागतिक भ्रष्टाचार निर्देशांकानुसार २००२ ला भारताचा भ्रष्टाचार निर्देशांक ७.६ होता तर तो २००९ साली ०७.०५ पर्यंत वाढला. भारतीयांचे स्विस बँकेत १५०० करोड आहेत ते रुपयात परिवतीत केल्यास ६,७५,००० कोटी रु. इतके होईल. लोकशाहीचे अस्तित्व टिकविणे सवोत्कृष्ठ कामगिरी होय परंतू सर्व घरापर्यंत मुरलेला भ्रष्टाचार हे भारतीय लोकशाहीचे अपयश होय.

**६. पाणी :-**

भारत २०५० पर्यंत जागतीक तिसरी शक्ती बनेल परंतू आज भारतासमोर विकासाच्या वाटेवर असतांना मूलभूत गरज असलेली पाण्याची समस्या आ वासून बसलेली आहे. १९९१ ला भारतात दरडोई पाण्याची उपलब्धतता. २३०९ कयुबीक मीटर होती ती सदयस्थितीत १७०० मीटरपर्यंत कमी झाली. हाच बेग जर कायम राहीला तर २०५० साली दरडोई पाण्याची उपलब्धता १००० मीटरपर्यंत खाली येईल. नागरीकरणाचा विकास शुध्द पाण्यावर व त्याच्या उपलब्धतेवर अवलंबुन असतो. पाण्याचा मुख्य स्त्रोत नैसर्गिक पाऊस हा आहे. परंतू आज पर्यावरणाच्या असमतोलामूळे पाऊस पडण्याचे प्रमाण देखील असंतूलीत झाले आहे. कधी पूर तर कधी कोरडा दुष्काळ अशी समस्या निर्माण झाली आहे. नैसर्गिक पाऊस साठवून ठेवण्याची आज गरज आहे. विकसित देशाशी तुलना केल्यास त्या देशात ९०० दिवस नैसर्गिक पाऊस सातत्यांने पडल्यास संग्रहित करण्याची क्षमता आहे तर भारतात फक्त नियमित ३० दिवस पाऊस पडल्यास संग्रहणाची सोय आहे. शेतीसाठी ८०

टक्के, उद्योगासाठी ८ टक्के, घरगुती उपयोगासाठी ६ टक्के, वापर पाण्याचा केला जातो. गहू, ऊस, तांदूळासाठी पाण्याचा भरपूर वापर होतो. भारत तांदुळाचा सर्वात जास्त उत्पादन करणारा देश आहे. तांदुळाची भारतातून निर्यात केली जाते. बऱ्याचवेळा शेतकऱ्याच्या घरापर्यंत अन्नधान्य पोहचण्यापूर्वी त्याची नासाडी होते ते सडते त्यामूळे प्रत्यक्षरीत्या पाण्याच्या दुरुपयोग होतो. शहरी भागात पाण्याची चोरी व गळती खूप मोठया प्रमाणात आहे पाणी हे जीवन आहे परंतू अलीकडे प्रदुषित पाण्यामुळे अनेक रोगांना लोकांना बळी पडावे लागते आपण आज जर पाण्याचा योग्य वापर केला नाही तर आपले भविष्य अंधःकारमय आहे त्यामूळे आज देशातील प्रत्येकासमोर पाणी वाचवणे, पाण्याचा योग्य वापर करणे हे आव्हान आहे.

अशा पध्दतीने जागतिक स्पर्धेत भारताला आपले अस्तित्व स्पष्ट करत असतांना वरील आव्हानां बरोबरच सामजिक सुरक्षितता योजना राबविणे, कृषीव्यवसायाची पूनर्रचना करुन शक्य तेथे जमिनिचे पूनर्वाटप करणे, लागवड योग्य जमीन लागवडीखाली आणणे, सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक गतिमान करणे, शेतकऱ्यांना हमी भाव देणे, गरिबांना किमान किंमतीची घरे देणे, अंधःविश्वास, रुढी, परंपरा, दारिद्रय, बेकारी, आर्थिक विषमता ही सुध्दा आव्हाने आहेत.

या आव्हानांना सामोरे जाण्याकरीता बदलत्या जागतिकिकरणाच्या स्पर्धत संपूर्ण समाजघटकांना स्वतःचे स्थान निर्माण करण्याकरीता, स्पर्धेत टिकून राहण्याकरीता पारंपारिक शिक्षणाला जोड म्हणून नव्या गुणात्मक व स्पर्धात्मक पायावर उभी राहणारी शिक्षणव्यवस्था निर्माण करुन आपल्या सुप्त अशा मानवी संसाधन शक्तीचा पुरेपुर लाभ घेणे आवश्यक आहे.

**गोषवारा :**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताची अर्थव्यवस्था एक मागास अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे होत आहेत. स्वातंत्रोत्तर काळात भारताने संमिश्र अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला. देशाच्या विकासाकरिता मा. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्या नंतर नियोजन पद्धतीचा अवलंब केला. १९५१ पासून पहिली पंचवार्षिक योजना राबविण्यात आली आज जवळजवळ १२ पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या गेल्या. भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल अविकसित अर्थव्यवस्थेकडून विकसनशील अर्थव्यवस्थेकडे वेगाने सुरु आहे. १९९१ पासून भारताने आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला गेल्या २९ वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल मिश्र अर्थव्यवस्थेकडून उदयोन्मुख अर्थव्यवस्थेकडे सुरु आहे. गेल्यादोन दशकात भारताच्या आर्थिक वृद्धीचा दर सरासरीने ५% पेक्षाही जास्त राहिला आहे. भारत विविधतेने नटलेली भूमी आहे. आज भारतीय अर्थव्यवस्था वेगाने पुढे येणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते.

नविन आर्थिक धोरणापासून भारताने विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ यात लक्षणीय झेप घेतली आहे. भारतीय बाजाराला स्वदेशी अत्पादकांना विदेशी उत्पादकांशी स्पर्धा करावी लागते. आजची अर्थव्यवस्था गुंवात्ताधिष्ठ्त अर्थव्यवस्था, ज्ञानाधिष्ठ्त अर्थव्यवस्था, बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे भारतीय बाजारातील स्वदेशी उत्पादकांसमोर स्पर्धेचे आव्हान निर्माण झालेले आहे. स्वदेशी उद्योगातील उत्पादन व्यय घटत असून उत्पादनाचा दर्जा उंचावताना दिसतो. भारताच्या निर्यातीत वाढ झाली नविन आर्थिक धोरणाचे अनेक फायदे भारतीय अर्थव्यवस्थेत दिसत असले तरी भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेला अनेक आव्हानांना समर्थपणे सामोरे जावे लागत आहे.

**जागतिक स्पर्धेत भारतासमोरील आव्हाने -**

**१. मानवी संसाधन विकासावर भर :-**

मानवी संसाधन विकासाच्या शिक्षण प्रकारात कौशल्याधारीत शिक्षण मिळणे आवश्यक आहे. संशोधनाच्या क्षेत्रात प्रामुख्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर यांना विशेष सवलती व संधोधनासाठी अनुदान देण्यात यावे.

शिक्षणाबरोबरच आरोग्य विषयक सुधारणा देशात करणे गरजेचे आहे. केवळ दवाखान्यांची संख्या वाढवून चालणार नाही तर कुशल डॉक्टर त्या ठिकाणी असले पाहिजे.

**२. युवकांच्या प्रश्नांची सोडवणूक हे एक आव्हान :-**

आज एकिकडे फार मोठया प्रमाणात देशाच्या सरक्षणाकरिता अणुबाँबवर खर्च केला जातो दुसरी कडे भुकेचा प्रश्न आ वासून उभा आहे. दरवर्षी १५ दशलक्ष मुले चांगल्या पोषक आहाराअभावी मृत्यू पावतात. आज भूकेचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**३. लघु आणि कुटीर उद्योगांचे जागतिकिकरण होणे हे एक आव्हान :-**

जागतिक पातळीवरील लघु-कुटीर उद्योग भारतात आणून भारतीय लोकांसाठी प्रशिक्षणासह उपलब्ध करुन दिल्यास उद्योगात नाविन्य येवू शकते. ग्रामीण भागात लघुउद्योग निर्माण केले जावे. त्यासाठी सरकारने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**४. भ्रष्टाचार :-**